# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः13.02.2024** **वारःमंगळवार**

---

1. युवा पिढीला देशाच्या विकासात सहभागी करून घेण्यासाठी केंद्र सरकार कार्यरत असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
2. नव्यानं भरती झालेल्या एक लाखाहून अधिक उमेदवारांना नियुक्तीपत्रांचं वितरण
3. राज्यातील शासकीय रुग्णालयं आणि वैद्यकीय महाविद्यालयांचा कायापालट करण्यासाठी आशियाई विकास बँकेकडून कर्ज मंजूर आणि
4. माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेस नेते अशोक चव्हाण यांचा पक्ष सदस्यत्व आणि आमदारकीचा राजीनामा

**पंतप्रधान-रोजगार मेळावा**

युवा पिढीला देशाच्या विकास प्रक्रियेत सहभागी करून घेण्यासाठी केंद्र सरकार सातत्यानं प्रयत्न करत आहे; असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. तरुणांना आपली क्षमता दाखवण्याची समान संधी मिळावी यासाठी सरकार निश्चित कालावधीत भरती प्रक्रिया पूर्ण करण्याचा प्रयत्न करत असल्याचं त्यांनी सांगितल. पंतप्रधानांनी काल रोजगार मेळाव्यात एक लाखांहून अधिक नवनियुक्त कर्मचाऱ्यांना दूरस्थ पद्धतीने नियुक्ती पत्रांचं वाटप केलं. त्यावेळी ते बोलत होते. सरकारने भरती प्रक्रिया पारदर्शक केली आहे. भरती झालेल्या नवीन उमेदवारांमुळे विकसित भारताच्या प्रवासाला नवी ऊर्जा मिळेल आणि त्यांचे प्रयत्न राष्ट्रनिर्मितीसाठी समर्पित असतील, असा विश्वास मोदी यांनी व्यक्त केला. केंद्र सरकारच्या कार्मिक विभागाच्या नव्या वास्तूची, अर्थात कर्मयोगी भवनच्या पहिल्या टप्प्याची पायाभरणीही यावेळी पंतप्रधानांच्या हस्ते करण्यात आली.

देशभरात 47 ठिकाणी हा रोजगार मेळावा झाला. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते नागपूर जिल्ह्याच्या हिंगणा इथल्या केंद्रीय राखीव पोलीस बल ग्रुप सेंटरमध्ये 119 उमेदवारांना नियुक्तीपत्रांचं वितरण करण्यातं आलं.

पुण्याजवळील तळेगाव इथल्या केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या केंद्रावर केंद्रीय मंत्री नारायण राणे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या रोजगार मेळाव्यात 191 जणांना सरकारी नोकरीची नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आली. नवनियुक्त कर्मचाऱ्यांनी प्रामाणिकपणे आणि शिस्तबध्द पद्धतीने, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून; विकसित भारताच्या उभारणीत योगदान द्यावं असं आवाहन राणे यांनी यावेळी केलं. ते म्हणाले.....

नवनियुक्त उमेदवार तनुजा नेवसे आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना म्हणाली.....

**<u>मुख्यमंत्री-रुग्णालयनिधी</u>**

राज्यातील शासकीय रुग्णालयं आणि वैद्यकीय महाविद्यालयांचा कायापालट करण्यासाठी आशियाई विकास बँकेने 4 हजार कोटी रुपये मंजूर केले असल्याची माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल मुंबईत झालेल्या बैठकीत दिली. या योजनेच्या पहिल्या टप्प्यात 12शे कोटी रुपये उपलब्ध करून देण्यास बँकेने तत्वत: मान्यता दिली असून, राज्यातील आकांक्षीत जिल्ह्यांमध्ये अद्ययावत आणि दर्जेदार जिल्हा रुग्णालय उभारण्यासाठी हा निधी खर्च करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. धाराशिव जिल्ह्यात 500 खाटांचं अद्ययावत जिल्हा रुग्णालय उभारण्याची कार्यवाही तत्काळ सुरु करण्याच्या सूचनाही शिंदे यांनी यावेळी दिल्या.

**<u>मुख्यमंत्री</u>**

राज्यातील जनतेला उत्तम आरोग्य सुविधा देण्यासाठी शासन कटिबद्ध असून प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हा सामान्य रुग्णालय सूपर स्पेशालिटी रुग्णालय बनवणार असल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं. उल्हासनगर महानगरपालिकेच्या सूपर स्पेशालिटी रुग्णालयाचं लोकार्पण काल शिंदे यांच्या हस्ते झालं; त्यावेळी ते बोलत होते.

**<u>बाराबलुतेदार</u>**

बारा बलुतेदारांसाठी श्री संत गाडगेबाबा आर्थिक मागास विकास महामंडळ स्थापन केलं जाईल, तसंच ओबीसी समाजाच्या आरक्षणाला धक्का लागू न देता मराठा समाजाला आरक्षण दिलं जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल मुंबईत दिली. राज्यातील बारा बलुतेदार समाज संघटनांच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्र्यांची भेट घेतली; त्यावेळी ते बोलत होते. कोविड काळात व्यवसाय बंद राहिल्याने आर्थिक विवंचनेतून नाभिक समाजातील काही व्यक्तिंनी आत्महत्या केली होती, अशांच्या कुटुंबियांना आर्थिक सहाय्य देण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. प्रतापगडावर शूरवीर जिवाजी महाले स्मारकासाठी जागा दिली जाईल. बारा बलुतेदार समाजासाठी विश्वकर्मा कौशल्य प्रशिक्षण योजना राबवली जाईल, असंही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

**<u>फडणवीस</u>**

पालघर आणि रायगड जिल्ह्यातील 17 कातकरी कुटुंबांना; सावकारांच्या जाचातून सोडवलेली जमिनीची मालकी काल परत मिळाली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा पुढाकार यासाठी अतिशय महत्त्वपूर्ण ठरला. अत्यंत थोडक्या पैशात किंवा काहीतरी वस्तू देऊन सावकारांनी बळकावलेल्या या जमिनी सोडवण्यासाठी फडणवीस यांनी 2019 मध्ये एका समितीची स्थापना केली होती. फडणवीस यांच्या हस्ते काल मुंबईत या कुटुंबांना जागांचे सातबारा उतारे देण्यात आले. कातकरी समाजाच्या पाठीशी सरकार ठामपणे उभे आहे, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

**<u>अशोक चव्हाण-मुंबई</u>**

राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेस नेते आमदार अशोक चव्हाण यांनी काल विधिमंडळ सदस्यत्वाचा तसंच काँग्रेस कार्यकारिणी आणि पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी चव्हाण यांचा राजीनामा स्वीकारला. आगामी काही दिवसात आपण आपली पुढची राजकीय भूमिका जाहीर करू असं त्यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितलं. हा निर्णय आपला वैयक्तिक निर्णय असून, अद्याप कोणत्याही पक्षाने आपल्याशी संपर्क साधला नसल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

**<u>कॉंग्रेस बैठक</u>**

दरम्यान, अशोक चव्हाण यांच्या राजीनाम्याच्या पार्श्वभूमीवर राज्यातील कॉंग्रेस नेत्यांची काल मुंबईत बैठक झाली. आणखी कोणी आमदार पक्ष सोडून जाणार नाहीत असा विश्वास पक्षाचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केला. राज्यसभा निवडणुकीसाठी पक्षाच्या विधिमंडळ सदस्यांची 14 आणि 15 तारखेला बैठक होणार असल्याची माहिती त्यांनी दिली आणि आवश्यकता भासल्यास व्हिप जारी केला जाईल असंही स्पष्ट केले. अशोक चव्हाण यांनी पक्ष सोडण्यामागची कारणं माहीत नसल्याचं ते म्हणाले. विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनीही चव्हाण यांच्या राजीनामा धक्कादायक असल्याचं मत व्यक्त केलं.

**<u>नाट्य संमेलन-लातूर</u>**

100व्या नाट्य संमेलनाला कालपासून लातूर इथे प्रारंभ झाला. संमेलनाची सुरुवात नाट्यदिंडीने झाली. लोकवाद्यांच्या निनादात निघालेल्या या नाट्यदिंडीमध्ये लोककलावंत, पारंपरिक कलाकारांसह लातूरकर मोठ्या संख्येने सहभागी झाली होते.

**<u>भांडारकर</u>**

भारताची संस्कृती आणि देशातील विविध भाषांना जोडण्याचं काम संस्कृतमुळे झालं असून संस्कृत भाषेचा अधिकाधिक प्रचार आणि प्रसार करण्याची गरज आहे, असं प्रतिपादन पुणे आकाशवाणी केंद्राचे सहाय्यक संचालक इंद्रजीत बागल यांनी काल केलं. पुण्यातील भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेच्या लघुसिद्धान्तकौमुदी या ऑनलाईन अभ्यासक्रमाच्या यशस्वी विद्यार्थ्यांना प्रशस्तिपत्र देऊन गौरव करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते.

**<u>विकसित भारत-नांदेड</u>**

नांदेड महापालिका हद्दीतील दुसऱ्या टप्प्यातील विकसित भारत संकल्प यात्रेचा काल मारोप झाला. शहरातील नंदिग्राम सोसायटी इथं संकल्प यात्रा पोहोचली. यावेळी नागरिकांना विविध शासकीय योजनांची माहिती देण्यात आली. अनेक नागरिकांनी यावेळी आयुष्यमान कार्ड काढल, तसंच यावेळी पंतप्रधान स्वनिधी योजनेसाठी अर्ज स्वीकारण्यात आले. अनेक नागरिकांची आरोग्य तपासणीही करण्यात आली.

**<u>अंत्यसंस्कार-बेनके</u>**

जुन्नरचे माजी आमदार वल्लभ बेनके यांच्या पार्थिव देहावर, काल जुन्नर तालुक्यातील हिवरे बुद्रुक इथे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. उपमुख्यमंत्री अजित पवार आणि सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी बेनके यांच्या पार्थिवावर पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धांजली वाहिली.

**<u>एमओए क्रीडा पुरस्कार</u>**

राष्ट्रीय क्रीडा पातळीवर गेल्या काही काळात महाराष्ट्र संघ चमकदार कामगिरी करत आहे. अशा खेळाडू आणि संघटनांना प्रोत्साहन देण्याचा निर्णय आता राज्य सरकारबरोबर महाराष्ट्र राज्य ऑलिम्पिक संघटनेनंही घेतला आहे. या वर्षीपासून महाराष्ट्र राज्य ऑलिम्पिक संघटनेने एमओए क्रीडा पुरस्कार देण्याची घोषणा केली आहे. महाराष्ट्र राज्य ऑलिम्पिक संघटनेच्या पुण्यात झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये

नुकताच हा निर्णय घेण्यात आला. उपमुख्यमंत्री आणि महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेचे अध्यक्ष अजित पवार, क्रीडा मंत्री संजय बनसोडे, क्रीडा आयुक्त राजेश देशमुख यांच्यासह राज्य ऑलिम्पिक संघटनेचे सर्व पदाधिकारी आणि सदस्य यावेळी उपस्थित होते. सर्वोत्कृष्ट जिल्हा संघटना, राज्य संघटना, सर्वोत्कृष्ट खेळाडू आणि सर्वोत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शकांना हे पुरस्कार दिले जातील.

**हवामान**

येत्या 24 तासात कोकण मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात हवामान कोरडं राहण्याची शक्यता असून विदर्भात तुरळक ठिकाणी वीजांसह पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं; नमस्कार..